MAHARASHTRA TOURISM

# महाराष्ट्र
# एक अनोखं जग

पर्यटन संचालनालय, पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन

मे २०२६ / अंक ५



आरे वारे समुद्रकिनारा



काळू धबधबा



चिखलदरा

## महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

मे 2026 मध्ये महाराष्ट्रातील पर्यटन उपक्रमांना चांगला प्रतिसाद मिळाला. हंगामी पर्यटनस्थळे, सांस्कृतिक उत्सव आणि विविध कार्यक्रमांमुळे राज्यात पर्यटनाचा उत्साह कायम राहिला. कोकणातील कुणकेश्वर येथे झालेल्या आंबा महोत्सवाने मोठ्या संख्येने पर्यटकांना आकर्षित केले. यावेळी पर्यटकांनी प्रसिद्ध हापूस आंब्याचा आस्वाद घेतला. तसेच, DMO कार्यशाळेमुळे पर्यटनस्थळांच्या प्रभावी व्यवस्थापनाबाबत राज्याची बांधिलकी अधोरेखित झाली. राज्यभरातील पर्यटनस्थळांकडे पर्यटकांचा ओढा कायम राहिला. विविध अनुभव देणाऱ्या महाराष्ट्राच्या पर्यटन वैविध्यामुळे राज्याचे आकर्षण आणखी वाढल्याचे दिसून आले.

## • महाराष्ट्रातील विशेष उपक्रमांचा आढावा

### आंबा महोत्सव 2026ला पर्यटकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



कोकण विभागातील पर्यटनाला चालना देणे तसेच स्थानिक पर्यटन आणि सांस्कृतिक वारशाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन विभागामार्फत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुवर्ण वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'आंबा महोत्सव 2026'ला पर्यटकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पर्यटन विभागाचे उपसचिव श्री. संतोष रोकडे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले असून, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन आणि कोकणातील पारंपरिक खाद्यसंस्कृतीमुळे महोत्सवाला विशेष रंगत प्राप्त झाली आहे.

फार्म टू टेबल या संकल्पनेवर आधारित 'आंबा महोत्सव 2026'चे आयोजन मा. पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई तसेच मा. पर्यटन राज्यमंत्री श्री. इंद्रनील नाईक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. मा. अपर मुख्य सचिव (पर्यटन) श्री. संजय खंदारे (भाप्रसे) आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे मा. व्यवस्थापकीय संचालक श्री. नीलेश र. गटणे (भाप्रसे) यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.
तसेच पर्यटन विभागाचे उपसचिव श्री. संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक श्री. चंद्रशेखर जयस्वाल यांच्यासह संबंधित विभागीय अधिकारी आणि रिसॉर्ट व्यवस्थापन पथक महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयाने कार्यरत आहेत.

### पर्यटन स्थळांच्या विकासाला गती देण्यासाठी डेस्टिनेशन मॅनेजमेंट कार्यशाळा

राज्यातील पर्यटन प्रशासन अधिक सक्षम करण्यासह जागतिक दर्जाच्या पर्यटन स्थळांच्या विकासाला गती देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या वतीने दि. 12 मे 2026 रोजी ट्रायडेंट हॉटेल, नरिमन पॉइंट, मुंबई येथे 'डेस्टिनेशन मॅनेजमेंट ऑर्गनायझेशन्स' (DMO) विषयक उच्चस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




ही कार्यशाळा जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या 'महाSTRIDE' उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्र पर्यटन संचालनालयामार्फत या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत असून महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) ही संस्था कार्यक्रम व्यवस्थापनासाठी कार्यरत आहे.

कार्यशाळेतील प्रमुख आकर्षणांपैकी एक असलेल्या "डीएमओची भूमिका आणि महाराष्ट्राची वैशिष्ट्यपूर्ण ओळख 'भारताचा अनुभव तुम्हाला येथे मिळेल'" या विषयावरील विशेष परिसंवादात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, सॅफरॉन स्टेचे सह-संस्थापक देवेंद्र परुळेकर, ॲक्टिव्ह एक्सपिरियन्स लिमिटेडचे मुख्य अधिकारी वसीम शेख तसेच पर्यटन क्षेत्रातील अन्य तज्ज्ञ सहभागी झाले होते.

## आळंदीत ‘महाराष्ट्र तेजोत्सव’ कार्यक्रम उत्साहात संपन्न, भक्ती, संस्कृती आणि प्रकाशोत्सवाची पर्यटकांना भूरळ




संत ज्ञानेश्वर माऊलींची पावन भूमी आणि वारकरी संप्रदायाचे आध्यात्मिक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदी नगरीत ‘महाराष्ट्र तेजोत्सव’ कार्यक्रम थाटामाटात पार पडला. 12 मे ते 14 मे 2026 दरम्यान इंद्रायणी घाट येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. “महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा ही राज्याची मोठी ताकद आहे. ‘महाराष्ट्र तेजोत्सव’सारखे उपक्रम आपल्या संस्कृतीचे जतन आणि गौरव करण्याबरोबरच महाराष्ट्राला राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर एक महत्त्वाचे सांस्कृतिक पर्यटन स्थळ म्हणून ओळख निर्माण करून देतात. या भव्य सोहळ्यामुळे आळंदी नगरी भक्तिमय, सांस्कृतिक आणि कलात्मक तेजाने उजळून निघाली,” असे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.

- **आगामी कार्यक्रम**

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मुंबईत भव्य ‘सी-साईड योग उत्सव’

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त 21 जून 2026 रोजी मुंबईतील प्रियदर्शिनी पार्क येथे भव्य ‘सी-साईड योग उत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. योगिक गुरुकुल, प्रियदर्शिनी पार्क आणि इतर संस्थांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या उपक्रमाला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांचेही सहकार्य लाभले आहे. समुद्रकिनाऱ्यावरील निसर्गरम्य वातावरणात सकाळी 6 वाजल्यापासून हजारो योगप्रेमी एकत्र येऊन योगसाधना करणार आहेत. निरोगी जीवनशैलीचा प्रसार, शारीरिक व मानसिक स्वास्थ्याबाबत जनजागृती आणि योगाचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचविणे हा या उत्सवाचा मुख्य उद्देश आहे.



## • महत्त्वाच्या बातम्या

## उन्हाच्या तडाख्यातही कोकण पर्यटन फुलले



उन्हाचा कडाका वाढला असला तरीही पर्यटकांचा उत्साह कमी झालेला नाही. वीकेंडला रत्नागिरी जिल्ह्यातील पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांचा राबता अधिक आहे. उष्मा वाढल्यामुळे पर्यटकांकडून निवासासाठी वातानुकूलित खोल्यांना अधिक प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे वातानुकूलित खोल्यांचे दर 40 टक्क्यांनी वाढले आहेत. यंदा सर्वाधिक गर्दी दापोली तालुक्यातील किनारे, गणपतीपुळे आणि गुहागर या तीन ठिकाणांच्या किनाऱ्यांवर होत आहे.

यंदाचा उन्हाळा कडाक्याचा असून, तापमानाचा पारा एक ते दोन अंशाने वाढलेला आहे. गेल्या काही दिवसांत रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागांतील तापमान 35 ते 40 अंशांवर गेले आहे. आर्द्रता वाढल्यामुळे वातावरणात होत असलेले बदल आणखीनच त्रासदायक होत आहेत. गेल्या काही दिवसांत गणपतीपुळे मंदिरात दिवसाला 15 ते 20 हजार पर्यटकांची नोंद होत आहे.

## रायगडच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील – पर्यटनमंत्री शंभूराज देसाई



रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी जिल्ह्यात सुरू असलेल्या पर्यटनांच्या कामांना गती मिळावी म्हणून निधी उपलब्ध करून देण्यासाठी पर्यटन विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी केल्या. मेघदूत शासकीय निवासस्थान येथे रायगड लोकसभा मतदारसंघातील पर्यटन विभागाच्या कामासंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते.

यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यटन राज्यमंत्री श्री. इंद्रनील नाईक, खासदार सुनिल तटकरे, पर्यटन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. संजय खंदारे (भा.प्र.से.), महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. नीलेश गटणे (भा.प्र.से.) यासह रायगड जिल्ह्याचे अधिकारी दृकश्राव्य प्रणालीद्वारे बैठकीला उपस्थित होते.

## कृषी पर्यटनात वीस टक्क्यांची वाढ; नाशिक जिल्ह्यात 75 केंद्रे

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून अर्थार्जनाचा एक नवीन पर्याय बनलेल्या कृषी पर्यटनाला सुगीचे दिवस आले आहेत. गेल्या वर्षभरात जिल्ह्यातील कृषी पर्यटनात जवळपास 20 टक्क्यांनी वाढ झाली असून, या व्यवसायाला शेतकऱ्यांकडून प्राधान्य मिळू लागले आहे. सध्या कृषी पर्यटनाचे नाशिक विभागात 110, तर नाशिक जिल्ह्यात 75 प्रकल्प कार्यान्वित आहेत.

या घरगुती उद्योगाला राज्य शासनाच्या सप्टेंबर 2020 कृषी पर्यटन धोरणाने बळ दिले. कोविडनंतर कृषी पर्यटनाकडे वळणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण वाढले असून, गेल्या वर्षभरात यामध्ये 20 टक्क्यांनी वाढ झाली आहे. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार व अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये सध्या 110 कृषी पर्यटन प्रकल्प असून, एकट्या नाशिक जिल्ह्यात यापैकी 75 प्रकल्प आहेत. त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, निफाड यासह मखमलाबाद, पिंपळगाव, वाडीव्हरे येथे कृषी पर्यटन बहरत आहे. शहरी वातावरणातून थोडासा निवांतपणा मिळावा म्हणून नाशिककरही कृषी पर्यटनास प्राधान्य देत आहेत. एका दिवसाची सहल किंवा एक रात्र मुक्काम अशा पद्धतीने पॅकेजेस उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

## लंडनच्या बसवर झळकली महाराष्ट्र पर्यटनाची जाहिरात

महाराष्ट्र दिनानिमित्त न्यूयॉर्कच्या जागतिक प्रसिद्ध टाइम्स स्क्वेअरवर झळकलेल्या महाराष्ट्र पर्यटनाच्या जाहिरातीनंतर आता लंडनमधील बसवर दिसलेल्या ‘अद्वितीय महाराष्ट्र’ मोहिमेची जोरदार चर्चा आहे. लंडनमध्ये वास्तव्यास असलेल्या एका मराठी तरुणाने बसवरील महाराष्ट्र पर्यटनाची जाहिरात पाहिल्यानंतर व्यक्त केलेली भावनिक प्रतिक्रिया सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.




महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे आणि मा. सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र पर्यटन विभागाने जागतिक स्तरावर ‘अद्वितीय महाराष्ट्र’ ब्रँड अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विशेष प्रचार मोहीम सुरू केली आहे. पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या पर्यटन वैभवाची जागतिक पातळीवर प्रभावी मांडणी करण्यावर भर दिला जात आहे.

पर्यटन विभागाच्या या जागतिक प्रचार मोहिमेमुळे परदेशातील मराठी बांधवांमध्ये महाराष्ट्राविषयी नव्याने आपुलकी आणि अभिमानाची भावना निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे लक्ष महाराष्ट्राकडे वेधून राज्यातील पर्यटन क्षेत्राला चालना मिळण्यासही मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## पर्यटन विभागाचे परदेश दौरे रद्द करण्याचे निर्देश

पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर इंधन बचत, परकीय चलन संवर्धनाच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पर्यटन विभाग आणि त्यासंबंधित शिष्टमंडळाचे आगामी काळातील सर्व नियोजित परदेश दौरे तत्काळ रद्द करण्यात यावे असे निर्देश राज्याचे माननीय पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. “पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशपातळीवर केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार आम्ही हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शासकीय यंत्रणेसह राज्यभरातील जनतेनेही देशाच्या सर्वांगीण आर्थिक विकासासाठी इंधन आणि परकीय चलन बचतीच्या मोहिमेमध्ये सहभागी व्हावे” असे आवाहन पर्यटन मंत्री श्री. शंभूराज देसाई यांनी केले.

राष्ट्रहिताच्या दृष्टीने परदेश दौरे रद्द करण्यासंदर्भातील अधिकृत आदेशाचे पत्र पर्यटन विभागाच्या अपर मुख्य सचिवांना जारी करण्यात आले आहे. तसेच संबंधित सर्व यंत्रणा व अधिकाऱ्यांना त्वरित अंमलबजावणी करण्याचे निर्देश पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

# महाराष्ट्रातील प्रसिद्ध उन्हाळी पर्यटन स्थळे

## इगतपुरी



नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी हे महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय पावसाळी पर्यटनस्थळांपैकी एक आहे. जून महिन्यात येथील डोंगररांगा, धबधबे आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांना आकर्षित करतो. भातसा नदी खोरे, कावनई किल्ला, त्रिंगलवाडी किल्ला आणि वैतरणा धरण ही येथील प्रमुख आकर्षणे आहेत. साहसी पर्यटन आणि ट्रेकिंगची आवड असणाऱ्यांसाठी इगतपुरी हे उत्तम ठिकाण मानले जाते. मुंबई-नाशिक महामार्गावर असल्याने येथे पोहोचणे सोपे आहे. मुंबईपासून सुमारे 120 किमी आणि नाशिकपासून सुमारे 45 किमी अंतरावर इगतपुरी वसलेले आहे.

## ताम्हिणी घाट

पुणे आणि रायगड जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेला ताम्हिणी घाट हा पावसाळ्यातील निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. जूनमध्ये येथे असंख्य छोटे-मोठे धबधबे, ढगांनी वेढलेले डोंगर आणि हिरव्यागार दऱ्या पर्यटकांचे मन मोहून टाकतात. फोटोग्राफी, निसर्गभ्रमंती आणि वीकेंड ड्राइव्हसाठी हे ठिकाण विशेष लोकप्रिय आहे. मुळशी धरणाचा परिसर आणि घाटातील नयनरम्य दृश्ये पर्यटकांना अविस्मरणीय अनुभव देतात. पुण्यापासून सुमारे 50 किमी अंतरावर असलेला ताम्हिणी घाट पावसाळ्यात हजारो पर्यटकांना आकर्षित करतो.



## लोणावळा



सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेले लोणावळा हे महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय हिल स्टेशनपैकी एक आहे. जून महिन्यात सुरू होणाऱ्या पावसामुळे येथील निसर्ग अधिकच खुलून दिसतो. भुशी धरण, टायगर पॉईंट, लायन्स पॉईंट, राजमाची किल्ला आणि कार्ला-भाजे लेणी ही येथील प्रमुख पर्यटनस्थळे आहेत. ढगांनी व्यापलेले डोंगर, धबधबे आणि थंडगार वातावरणामुळे लोणावळा कुटुंबीयांसह सहलीसाठी आदर्श ठरते. मुंबई आणि पुणे या दोन्ही शहरांपासून सहज पोहोचता येत असल्याने वीकेंड पर्यटनासाठी हे ठिकाण विशेष पसंतीस उतरते. मुंबईपासून सुमारे 85 किमी आणि पुण्यापासून 65 किमी अंतरावर लोणावळा वसलेले आहे.



MAHARASHTRA TOURISM

MAHARASHTRA

www.maharashtratourism.gov.in | www.mahaatithi.org

**Follow us on:**

MaharashtraTourism diot@maharashtratourism.gov.in @maha_tourism

maharashtratourismofficial